**जिल्हाधिकारी (पुनर्वसन शाखा), जिल्हा पुनर्वसन अधिकारी/ उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांच्या नावाने दिवाणी न्यायालयात दाखल पुनर्वसन विषयक दावे- दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबत न्यायालयास अवगत करुन दावे निकाली काढण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**मदत व पुनर्वसन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक आरपीए -२०२६/ प्र. क्र. ई - १७१०९००/पुनर्वसन -१,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०५ ऑगस्ट, २०२६

**<u>संदर्भ</u>** :- १. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ कलम २२ व महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम २४.
२. शासन परिपत्रक क्र. आरपीए १०९३/प्र.क्र.१४५/९-२, दिनांक ०१.०९.१९९३

वरील सदर्भानुसार, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ मधील कलम २२ तसेच, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम २४ नुसार, या अधिनियमांखाली प्रकल्प प्राधिकरण/ जिल्हाधिकारी/ आयुक्त/ राज्य शासन यांच्या अखत्यारीत असलेल्या प्रश्नांबाबत दिवाणी न्यायालयास अधिकारक्षेत्र नाही.

२. तसेच, शासन परिपत्रक दिनांक ०१.०९.१९९३ नुसार अशा प्रकरणांमधील प्रलंबित दावे रद्दबातल करुन घेण्यासाठी न्यायालयाच्या निदर्शनास सदर बाब आणून देणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

१. जिल्हाधिकारी (पुनर्वसन शाखा), जिल्हा पुनर्वसन अधिकारी/ उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांच्या नावाने दिवाणी न्यायालयात दाखल असलेले सर्व पुनर्वसन विषयक दावे तात्काळ शोधून त्यांच्या प्रकरणनिहाय यादी तयार करणे.

२. प्रत्येक प्रकरणात संबंधित जिल्हा सरकारी अधिवक्त्यास वरील कायदेशीर तरतुदी व शासन परिपत्रकाचा संदर्भ देऊन दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाबत हरकत मांडण्याच्या स्पष्ट लेखी सूचना द्याव्यात.

३. जिल्हा सरकारी अधिवक्ता यांनी न्यायालयात आवश्यक अर्ज/निवेदन दाखल करुन, दावे दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर असल्याची बाब निदर्शनास आणून देऊन उचित आदेश करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.

४. अशा प्रत्येक प्रकरणात झालेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल, ज्यात प्रकरण क्रमांक, न्यायालयाचे नाव, हरकत दाखल केल्याची तारीख आणि न्यायालयाचा आदेश/ सद्यस्थिती नमूद असेल, तो दर तीन महिन्यांनी मदत व पुनर्वसन विभागास सादर करावा.

वरील निर्देशांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

३. सदर शासन परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन संकेताक २०२६०८०५१२१११९२७४१ असा आहे. सदरचे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=F0D616600E4D2F510D1C8CC19813E070AD282D2275BF6FC132A2DEE97F14E0A6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D337930B14433DC62C0154AF2BBC60BB5A6EDCAA66B7F34596C50A27EB0F6333, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.08.05 12:12:19 +05'30'

**( संजय इंगळे )**

**सह सचिव, मदत व पुनर्वसन विभाग**

**प्रति,**

१. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी/ सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी / उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन).
६. सह सचिव (पुनर्वसन) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. निवडनस्ती कार्यासन र-१, महसुल व विभाग, मंत्रालय, मुंबई ३२